# सेंटर पॉईंट स्कुल ने जिंकले टीसीएस आयटी विझ २०१७ नागपूर फेरीचे विजेतेपद

## विजेते मुंबईत राष्ट्रीय अंतिम फेरीसाठी शहराचे प्रतिनिधित्व करणार



**नागपूर, १२ सप्टेंबर :** देशातील अग्रणी कन्सल्टन्सी व बिजनेस सोल्युशन्स कंपनी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीस) तर्फे आयोजित भारतातील सर्वात मोठी आंतर-शालेय प्रश्नमंजुषा स्पर्धा,टीसीएस आयटी विझ' च्या नागपूर, प्रादेशिक फेरीत नागपूर भिलाई, रायपुर आणि दुर्गच्या विविध शाळांच्या नऊशेच्या वर विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. मंगळवार, १२ सप्टेंबरला वसंतराव देशपांडे सभागृह, सिव्हिल लाईन्स येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. इयत्ता ८ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी ही निःशुल्क स्पर्धा आयोजित करण्यात येते. दोन विद्यार्थी असलेल्या ८ चमूंपर्यंत एका शाळेतून विद्यार्थी सहभागी होऊ शकतात.

यावर्षीच्या स्पर्धेची संकल्पना 'ऑटोमेशन, संदर्भ ज्ञान, मशीन शिक्षण आणि चपळता' ही होती. जागतिक स्तरावरील तंत्रज्ञानातील वेगवेगळ्या पैलूंवर या प्रश्नमंजुषेद्वारे प्रकाश टाकल्या जातो. प्रश्नमंजूषेत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना या ज्ञानाचा त्यांच्या भविष्यात फायदा होईल. लेखी प्राथमिक फेरीद्वारे प्रादेशिक अंतिम फेरीसाठी सहा टीम निवडण्यात आल्या.

प्रादेशिक अंतिम फेरीतील प्रश्नमंजुषेच्या पाच फेऱ्यांनंतर सेंटर पॉईंट स्कुल, वर्धमान नगरच्या अर्चित वेणूगोपालन व संचित खेडकर या विद्यार्थ्यांनी स्पर्धा जिंकली. प्रादेशिक अंतिम फेरीतील विजेत्यांना ६० हजार रुपयांचे गिफ्ट व्हाउचर्स, तर उपविजेते ठरलेल्या कृष्णा पब्लिक स्कुल, रायपूरच्या गौरजा ऐरोन व यशराज मिश्रा यांना ४० हजार रुपयांचे गिफ्ट व्हाउचर्स तसेच स्मृतीचिन्ह व पदक देऊन गौरविण्यात आले. यासोबतच अंतिम फेरीतील सर्व ६ स्पर्धक चमूंना टीसीएस तर्फे जिम बॅग, ओटीजी, पेनड्राइव्ह, इअरफोन्स, ब्लूटूथ स्पिकर्स असे आकर्षक बक्षीस देण्यात आले. राष्ट्रीय अंतिम फेरीत भाग घेण्यासाठी विजेत्या टीमला एक शिक्षक/पालकासोबत विमानाद्वारे मुंबईला नेण्यात येईल.

स्थानिक व्हीएनआयटीचे डायरेक्टर डॉ. नरेंद्र चौधरी आणि टीसीएस नागपूरचे सेंटर हेड श्री अरविंद कुमार यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन गिरी 'पिकब्रेन' बालसुब्रमण्यम यांनी केले. टीसीएस आयटी विझ २०१७ देशातील १२ शहरांमध्ये घेण्यात येते यात - अहमदाबाद, बेंगळुरू, चेन्नई, हैदराबाद, कोलकाता, इंदोर, नागपूर, भुवनेश्वर, कोची, दिल्ली, मुंबई आणि पुणे या शहरांचा समावेश आहे.